**अध्यक्ष महाराज,**

जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने चार महिन्यांपूर्वी महाराष्ट्रात निवडून आलेल्या शासनाचा हा पहिला अर्थसंकल्प राज्यातील जनतेच्या साक्षीने मांडताना मला अतिशय आनंद होत आहे.

अध्यक्ष महोदय, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांवर श्रद्धा ठेवणाऱ्या महाराष्ट्रातील जनतेने मोठ्या विश्वासाने हा बदल घडविला आहे. मला येथे सांगितलेच पाहिजे की, इथल्या सुजाण जनतेने हा बदल मूठभर लोकांना मोठे करण्यासाठी घडविलेला नाही. त्यांना त्यांच्या स्वप्नातला महाराष्ट्र घडवावयाचा आहे. यासाठी जनतेने आम्हाला सेवेची संधी दिली आहे. जनतेने व्यक्त केलेला विश्वास सार्थ ठरविण्याचा संकल्प आमच्या सरकारने केला असून, अर्थमंत्री म्हणून मी आज सादर करीत असलेल्या अर्थसंकल्पातसुद्धा जनतेच्या त्याच आशा-आकांक्षा प्रतिबिंबित व्हाव्यात असा प्रयत्न करणार आहे. या राज्यातल्या दीनदुर्बल, शोषित, पिडीत, अंध, अपंग, निराधार, आदिवासी, दलित, शेतकरी, शेतमजूर, कष्टकरी,अल्पसंख्याक जनतेला हे राज्य त्यांचे आहे असे वाटावे त्यादृष्टीने हे सरकार हा अर्थसंकल्प सादर करीत आहे.

आज ११ कोटी जनतेचा हा महाराष्ट्र या अर्थसंकल्पाच्या माध्यमातून व्यक्त होणाऱ्या सरकारच्या मनोदयाकडे लक्ष लावून आहे, याची मला कल्पना आहे. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या संकल्पनेतला ग्राम विकास, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अपेक्षित असलेला सामाजिक न्याय, पंडित दीनदयाळ उपाध्याय यांनी मनाशी बाळगलेले अंत्योदयाचे स्वप्न, समाजातल्या माझ्या भगिनींची प्रगती, उच्चशिक्षण घेऊनही बेरोजगार राहिलेली इथली तरुणाई, शेतकरी, आदिवासी या सर्वांचा विचार मी आणि माझ्या सरकारने केला आहे. थोडक्यात, कोरडवाहू शेतीस स्थैर्य देणे, विषमता दूर करणे, पायाभूत सुविधांचा वेगाने विकास करणे, वाढत्या शहरीकरणाच्या आव्हानास समर्थपणे सामोरे जाणे व सर्वात महत्त्वाचे, तरुणांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण करणे या गोष्टींना आम्ही प्राधान्य दिले आहे. मला जाणीव आहे की, जुन्या निर्णयांच्या अनुषंगाने तरतुदी ठेवणे अपरिहार्य ठरते व अर्थसंकल्पाची दिशा, त्यातील प्राथमिकता व तरतुदी एकाएकी

बदलता येत नाहीत. तथापि, पुढील ५ वर्षात वरील बाबींसाठी मी जास्तीत जास्त निधी उपलब्ध करीन. सुरुवात म्हणून मी या अर्थसंकल्पात वर नमूद केलेल्या बाबींकरिता तरतुदीत भरीव वाढ केलेली आहे.

मला कल्पना आहे की, जनतेच्या मनातले विकासाचे हे स्वप्न साकारताना आव्हांनाना सामोरे जावे लागणार आहे. या राज्यावर आज ३ लाख कोटी रुपयांच्यावर कर्ज आहे. त्या कर्जाच्या निव्वळ व्याजापोटी २४ हजार कोटी रुपयांच्यावर आम्हाला भरावे लागत आहेत. वित्तीय व्यवस्थापनाच्या दृष्टीने सर्वात मोठे आव्हान म्हणजे गेल्या काही वर्षात निर्माण झालेले महसुली असंतुलन. या वर्षी ही महसुली तूट १३ हजार ८८३ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे.

जर आपण कर्जे चालू खर्चासाठी वापरत असू, तर ते आपण भावी पिढीवर लादलेला अन्यायी बोजा होईल याची मला जाणीव आहे. महसुली संतुलन साधण्यासाठी ठोस पाऊले मी नक्कीच उचलेन. आपणास भावी पिढीसाठी भांडवली मत्ता निर्माण करावयाची आहे. मला ही पण जाणीव आहे की, सरकारी लेख्यात रकमांची भांडवली खर्च म्हणून नोंद झाली तरी त्यातून उत्पादक मत्ता निर्माण होतेच असे नाही. भांडवली खर्च अधिक परिणामकारक व्हावा यासाठी मी कठोर उपाययोजना करेन.

विकासासाठीची साधने आणि संपत्ती मर्यादित आहे. यातून मार्ग काढीत विकासाचा पल्ला गाठणे कठीण असले तरी, छत्रपती शिवरायांच्या आशीर्वादाने या आव्हांनाशी लढत विकासाच्या मार्गावर महाराष्ट्राला गतीने नेण्याचा आमचा संकल्प आहे.

या राज्यात आज उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीची मर्यादा लक्षात घेता, त्यात नाविन्यपूर्ण वाढ करण्यासाठी काही पर्याय आणि उपाय अमलात आणण्याचा निर्णय मी घेतला आहे. हे करत असताना मी अपारंपरिक माध्यमातून जसे की, जमिनीच्या वापरातील बदल, अतिरिक्त चटईक्षेत्र निर्देशांक, इत्यादीसाठी प्रचलित बाजारभावाच्या आधारे प्रिमियम फी आकारुन अतिरिक्त निधी प्राप्त करण्याचा प्रयत्न केला आहे. या उपाययोजनांचा बोजा सर्वसामान्य नागरिक व करदात्यांवर पडणार नाही, याची मी काळजी घेतली आहे.

गेल्या वर्षीच्या अर्थसंकल्पाचा विचार केला तर, आपल्या असे लक्षात येईल की, योजना जरी ५१ हजार २२२ कोटी ५४ लाख रुपयांची तयार झाली, पण प्रत्यक्ष त्याप्रमाणे महाराष्ट्राच्या विकासासाठी निधी उपलब्ध होऊ शकला नाही. आज रुपये ५४ हजार ९९९ कोटींची योजना मांडताना त्यातील पै न पै उपलब्ध करुन देण्याचा

माझा प्रयत्न असेल. उपलब्ध झालेल्या प्रत्येक पैशाचा विनियोग, आम्ही जनतेच्या पैशाचे विश्वस्त आहोत या भावनेतून केला जाईल. म्हणून आजचा हा अर्थसंकल्प खर्चावर आधारित नसेल तर, लक्ष्यावर आधारित असेल. यासाठी हे सरकार दूरदर्शी व महत्त्वाकांक्षी योजना जाहीर करीत आहे. त्या माध्यमातून ज्या योजनांसाठी शासनातर्फे वित्त पुरवठा केला जातो, त्या योजनांवर योग्य देखरेख करण्यासाठी एव्हिडन्स बेस्ड फोटोग्राफीद्वारे (Evidence Based Photography) मंत्रालयातून नियंत्रण करण्याच्या दृष्टीने मंत्रालयीन स्तरावर स्वतंत्र नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात येईल.

महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प करताना जनतेच्या आशा आकाक्षांचा अश्वमेघ पुढे नेताना "टीम महाराष्ट्र" म्हणून आपल्याला काम करावयाचे आहे. यात सत्ताधारी व विरोधी पक्षाचे सदस्य, शासकीय अधिकारी व कर्मचारी, शेतकरी, व्यापारी, उद्योजक या सर्व घटकांचा समावेश राहणार आहे. महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करताना कोणताही राजकीय अभिनिवेश आम्ही बाळगणार नाही. राज्याच्या उत्पन्नाचे नवीन स्रोत सुचविणाऱ्या त्याचप्रमाणे राज्याच्या खर्चामध्ये बचतीच्या अभिनव उपाययोजना सुचविणाऱ्या कल्पक शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना प्रोत्साहन देणारी एक नाविन्यपूर्ण योजना सुरु करण्यात येईल.

राज्यात मागील काही वर्षात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे प्रमाण लक्षणीय राहिले आहे. या कृषिप्रधान देशात शेतकऱ्यांच्या आत्महत्या ही निश्चितच मनाला वेदना देणारी बाब आहे. शेतकऱ्यांना आर्थिक विवंचनेतून मुक्त करण्यासाठी त्यांना आर्थिक स्थैर्य लाभावे व त्यांचे मनोबल वाढवावे यासाठी जलयुक्त शिवार अभियानासारखा अभिनव व महत्त्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांना प्रामुख्याने जबाबदार असलेल्या सावकारी कर्जाच्या बोजातून बळीराजाला मुक्त करण्यासाठी सावकारी कर्जातून मुक्ती देण्याचा निर्धार शासनाने केला आहे. केंद्र सरकारने २००८ मध्ये जाहीर केलेल्या योजनेचा लाभ सावकाराकडून कर्ज घेतलेल्या शेतकऱ्यांना देण्यात आला नव्हता. डिसेंबर २०१४ च्या अधिवेशनात मा. मुख्यमंत्र्यांनी केलेल्या जाहीर घोषणेनुसार मराठवाडा व विदर्भातील शेतकऱ्यांनी सावकारांकडून घेतलेले १५६ कोटी रुपयांचे कर्ज व त्यावरील १५ कोटी रुपये व्याज असे एकूण १७१ कोटी रुपये शासनाने अदा करुन २ लाख २३ हजार शेतकऱ्यांना कर्जमुक्त करण्याचा निर्णय घेतला आहे. सन २०१४ या वर्षामध्ये राज्यातील शेतकरी बंधुंना नैसर्गिक आपत्तींना तोंड द्यावे लागले आहे. दुष्काळाच्या पाठोपाठ गारपीट व अवकाळी पाऊस या संकटांचा त्यांना सामना करावा लागला. तथापि, या

शासनाने शेतकरी बंधुंच्या पाठीशी समर्थपणे उभे राहून त्यांना ४ हजार कोटी रुपयांचे आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन दिले आहे. या व्यतिरिक्त वीज बिल, परीक्षा शुल्क इत्यादी मध्येहीे सूट दिलेली आहे.

**जलयुक्त शिवार अभियान.** १. अनियमित पर्जन्यमानामुळे कृषिसाठी व पिण्यासाठी पाण्याची तीव्र टंचाई जाणवत असल्यामुळे त्यावर मात करण्यासाठी मी आताच उल्लेख केल्याप्रमाणे, जलयुक्त शिवार अभियान राबविण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. त्याअंतर्गत शिवारात पडणाऱ्या पावसाचे पाणी अडवून ते जमिनीत जिरवणे, भूगर्भातील पाणी पातळी वाढविणे, विकेंद्रीत पाणीसाठा निर्माण करणे नियोजित आहे. या योजनेअंतर्गत प्रत्येक गावाच्या पाण्याचे नियोजन करावयाचे असून विकेंद्रीत नियोजन व विकेंद्रीत अंमलबजावणी अभिप्रेत आहे. जलयुक्त शिवार ही योजना केवळ शासनाचीच नसून ती लोकांची स्वतःची योजना असेल. लोकांचा पुढाकार आणि सहभागातून ही गावे टंचाईमुक्त होतील, अशी मला खात्री आहे. या योजनेसाठी तब्बल १ हजार कोटी रुपये जिल्हा योजनेअंतर्गत उपलब्ध करुन दिले आहेत.

तसेच, विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करण्यासाठी महत्त्वाकांक्षी साखळी सिमेंट नाला बांध कार्यक्रमाअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये मागील वर्षाच्या जवळपास दुप्पट असा ५०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

गडचिरोली,भंडारा, गोंदिया व चंद्रपूर या जिल्ह्यांमधील माजी मालगुजारी तलावांची दुरुस्ती व नूतनीकरण यांसाठी नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययांपैकी १०० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**सूक्ष्म सिंचन अभियान.** २. राज्यात सूक्ष्म सिंचनाचा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबविण्यात येतो. यामध्ये सन २०१३-१४ अखेर सुमारे १६ लाख हेक्टर एवढे क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले आहे. या योजनेसाठी सन २०१५-१६ करिता ३३०कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. ह्या नियतव्ययात मागील वर्षीच्या १२ कोटी ५० लाखाच्या तुलनेत लक्षणीय वाढ करण्यात आली आहे.

**मोतीरामजी लहाने कृषि समृद्धी योजना.** ३. शेतकऱ्यांच्या सर्वाधिक आत्महत्या लक्षात घेता यवतमाळ जिल्ह्यात नवीन पथदर्शी " मोतीरामजी लहाने कृषि समृद्धी योजना " राबविण्यात येईल. या योजनेअंतर्गत कृषि यांत्रिकीकरण, कृषि क्षेत्रातील अन्य योजनांचे एकत्रीकरण या माध्यमातून शेतीची उत्पादकता वाढविण्यावर भर देण्यात येईल. या योजनेचा तपशील स्वतंत्रपणे जाहीर

करण्यात येईल. यासाठी सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययांपैकी ५० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**कृषिपंपांचे ऊर्जीकरण.**

४. विकेंद्रीत पाणीसाठे निर्माण करण्यासोबतच कृषिपंपांचे ऊर्जीकरण सुध्दा महत्त्वाचे ठरत आहे. सध्या जिल्ह्या-जिल्ह्यांत कृषिपंपांच्या दर हजारी हेक्टरी संख्येत मोठी तफावत आहे. विशेषतः कोरडवाहू असलेल्या जिल्ह्यांमध्ये हे प्रमाण अल्प आहे. राज्यात विभागा-विभागांतील विषमतेचे हे एक प्रमुख कारण आहे. येत्या दोन वर्षात ही विषमता दूर करण्याचे योजिले आहे. कृषिपंपांचे ऊर्जीकरण करण्यासाठी मागील वर्षाच्या १५० कोटी रुपयांच्या तुलनेत या वर्षी १ हजार ३९ कोटी रुपयांचा भरीव नियतव्यय प्रस्तावित आहे.

**सौर कृषिपंप.**

५. दीर्घकालीन ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने, अपारंपरिक ऊर्जा स्त्रोताच्या वापरास प्रोत्साहन देणे काळाची गरज आहे. नुकतेच केंद्र सरकारच्या योजनेअंतर्गत राज्यात ७ हजार ५४० सौर कृषिपंप बसविण्याचा पथदर्शी प्रकल्प हाती घेतला आहे. या योजनेमुळे शेतकऱ्यांना अधिक आश्वासित वीज पुरवठा मिळेल अशी अपेक्षा आहे.

**राज्य रोजगार हमी योजना व महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना.**

६. राज्यात सन २००८ पासून महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत जलसंधारण व जलसंवर्धन इत्यादी कामे सुरु आहेत. तसेच, राज्य रोजगार हमी योजनेअंतर्गत जवाहर/धडक सिंचन विहिरी व फलोत्पादन कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. याद्वारे ग्रामीण क्षेत्रातील अकुशल काम करु इच्छिणाऱ्या प्रौढ व्यक्तींना रोजगार देण्यात येत आहेत. राज्य रोहयो अंतर्गत ‘ क ’ वर्ग नगरपरिषदांमध्ये सुध्दा कामे अनुज्ञेय आहेत. राज्य रोजगार हमी योजनेसाठी सन २०१५-१६ मध्ये ७०० कोटी रुपये तर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी केंद्र हिश्श्यापोटी १ हजार ९४८ कोटी ८० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**कृषि विकासाच्या योजना.**

७. कृषि व संलग्न क्षेत्रात सुधारणा करण्यासाठी कृषि क्षेत्राचा वार्षिक वृद्धी दर ४ टक्के वाढविणे, हा राष्ट्रीय कृषि विकास योजनेचा प्रमुख उद्देश आहे. मी या योजनेसाठी एकूण ३३६ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित करीत आहे. तसेच, राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, कृषि विस्तार व तंत्रज्ञान अभियान आणि फलोत्पादन विकास अभियान या ३ योजनांसाठी सन २०१५-१६ करिता २५७ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

द्राक्ष शेतीस गारपीटीपासून संरक्षणासाठी विशेष प्रकारचे शेड नेट शेतकऱ्यांना खरेदी करण्यासाठी सहाय्य उपलब्ध करुन देण्यात येईल.

**देशी बी-बियाणांचे जतन व संवर्धन.** ८. राज्यातील शेतकऱ्यांनी प्रयत्नपूर्वक जतन केलेले गुणवत्तापूर्ण पारंपरिक देशी बीज, जीन बँक स्तरावर जतन व शास्त्रोक्त पध्दतीने संवर्धन करण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्यात येत आहेत. त्याकरिता सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागांतर्गत अवितरित नियतव्ययापैकी १० कोटी नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**पशुवैद्यकीय संस्थांचे आधुनिकीकरण, पशुखाद्य व चारा विकास कार्यक्रम.** ९. पशुवैद्यकीय संस्थांचे आधुनिकीकरण आणि पशुखाद्य व चारा विकास कार्यक्रम यांसाठी सन २०१५-१६ मध्ये १४० कोटी ९२ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण व मासेमारी जेट्टींचा विकास.** १०. मच्छिमार नौकांचे यांत्रिकीकरण करण्याकरिता राष्ट्रीय सहकार विकास निगमच्या माध्यमातून अर्थसहाय्य उपलब्ध करुन दिले जाते. यासाठी सन २०१५-१६ मध्ये १३ कोटी २५ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. तसेच नाबार्ड सहाय्यित ग्रामीण पायाभूत विकास निधी अंतर्गत सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, पालघर व मुंबई या जिल्ह्यांमध्ये जेट्टी उभारण्याचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. त्याकरिता सन २०१५-१६ मध्ये २० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**सिंचन.** ११. सिंचनाचे प्रकल्प अनेक वर्षे रखडल्यामुळे प्रकल्पांच्या किमतीत भरमसाठ वाढ झाली आहे. तसेच, अशा प्रकल्पांवर मोठ्या प्रमाणात निधी खर्च होऊनही त्याचा शेतकऱ्यांना प्रत्यक्ष लाभ मिळू शकला नाही. यासाठी आता प्रकल्पांचे अचूक तांत्रिक व वित्तीय नियोजन करुन प्रकल्प अंमलबजावणीचा कालबध्द कार्यक्रम हाती घेण्याचे या शासनाने ठरविले आहे.

सन २०१५-१६ मध्ये जलसंपदा विभागास ७ हजार २७२ कोटी रुपये एवढा नियतव्यय प्रस्तावित करण्यात आला असून ३८ सिंचन प्रकल्प पूर्ण करण्याचा शासनाचा निर्धार आहे. त्यातून सुमारे ७०० दशलक्ष घनमीटर पाणीसाठा उपलब्ध होईल व ६९ हजार हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येईल.

**मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना.** १२. राज्यातील ग्रामीण रस्त्यांची दुरावस्था ही चिंतेची बाब आहे. ग्रामीण रस्त्यांची दुरुस्ती व त्या माध्यमातून दळणवळणाची उत्तम सोय ग्रामीण जनतेला व्हावी यासाठी "मुख्यमंत्री ग्रामीण मार्ग योजना" ही महत्त्वाकांक्षी योजना राबविण्याचा निर्णय या

शासनाने घेतला आहे. या योजनेअंतर्गत जास्त लोकसंख्या असलेली गावे जोडणाऱ्या रस्त्यांचे उन्नतीकरण करण्यात येणार असून त्यासाठी ३५० कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे. या योजनेची प्रगती पाहून प्रतिवर्षी १ हजार कोटी पर्यंत भरीव निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. याशिवाय, जिल्हा नियोजन व विकास मंडळाअंतर्गत रस्त्यांच्या कामांसाठी १ हजार ४१३ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. कामे उत्तम दर्जाची व्हावीत यासाठी रस्त्यांच्या बांधकामासंदर्भातील डिफॉल्ट लायबलिटी (Default liability) सहा महिन्यावरुन पाच वर्षे करण्याचा शासनाचा मानस आहे.

**प्रधानमंत्री ग्राम सडक योजना.**

१३. प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत यावर्षी ७९० कोटी रुपये तसेच या योजनेअंतर्गत प्रशासकीय खर्च व भाववाढीच्या निकषात न बसणाऱ्या कामांसाठी ७१ कोटी रुपये असा एकूण ८६१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**रस्ते विकास.**

१४. सन २०१५-१६ मध्ये ५ हजार किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची सुधारणा करण्याचे उद्दिष्ट आहे. यासाठी ३ हजार २१३ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. आंतरराष्ट्रीय संस्थांच्या सहाय्याने, वार्षिकीद्वारा (Annuity) राज्यातील रस्त्यांचा अधिक वेगाने विकास करण्याचा शासनाचा मानस आहे.

**आमदार आदर्श गाव योजना.**

१५. केंद्र सरकारने "सांसद आदर्श गाव योजना" सुरु केली असून या योजनेअंतर्गत संसद सदस्यांनी सध्या कार्यरत असलेल्या विविध योजनांच्या कृतिसंगमातून (convergence) निवडलेल्या ग्रामपंचायतीचा विकास करावयाचा आहे. या योजनेला मिळालेला सकारात्मक व उत्साहवर्धक प्रतिसाद विचारात घेऊन शासनाने या योजनेच्या धर्तीवर "आमदार आदर्श गाव योजना" सुरु करण्याचे ठरविले आहे.

आदर्श गावाला संबंधित आमदाराने कुठल्याही प्रकल्पाला त्या प्रकल्पाच्या ५० टक्के निधी त्यांच्या आमदार निधीतून दिला, तर शासनाच्या इतर योजनांमधून त्या कामांना उर्वरित ५० टक्के निधी देण्यात येईल.

या माध्यमातून पुढील ५ वर्षात सुमारे १ हजार गावे विकसित होतील. यासाठी सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययांपैकी २५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**वीज निर्मिती.**

१६. वीज निर्मिती प्रकल्पांसाठी सन २०१५-१६ मध्ये ५३५ कोटी ३४ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**पायाभूत आराखडा.** १७. वीज वितरण प्रणालीची क्षमता वाढविणे, खात्रीशीर व दर्जेदार वीज पुरवठा करणे तसेच नवीन वीज जोडणी देण्यासाठी "पायाभूत आराखडा-२" ही योजना तयार करण्यात आली आहे. विदर्भ व मराठवाडा या भागात पायाभूत सुविधा तितकीशी विकसित झालेली नाही. म्हणून या भागांकडे अधिक लक्ष दिले जाईल. यासाठी राज्य शासनाच्या हिश्श्यापोटी सन २०१५-१६ मध्ये ५३८ कोटी ८३ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**जलविद्युत प्रकल्प.** १८. महाराष्ट्रातील औद्योगिकीकरण आणि कृषि क्षेत्रातील उर्जेची वाढती गरज आणि उच्च दाब वीज वाहिनी मंडलाचे समतोल स्थैर्य विचारात घेता जलविद्युत निर्मितीवर भर देणे आवश्यक आहे. जलविद्युत प्रकल्पांसाठी सन २०१५-१६ मध्ये ९०० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**वीज दर माफक करणे.** १९. राज्यातील विजेचे दर माफक ठेवण्यासाठी शासनाच्या अधिपत्याखालील वीज निर्मिती, पारेषण व वितरण या तीनही शासकीय कंपन्यांचा खर्च कमी करण्याकरिता दूरगामी तसेच त्वरित परिणामकारक असे सर्वंकष प्रयत्न करण्यात येत आहेत.

**पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना.** २०. राज्यातील दारिद्रय रेषेखालील कुटुंबाना निवारा उपलब्ध करुन देण्यास शासनाने अग्रक्रम दिला आहे. राज्यामध्ये सद्य:स्थितीत दारिद्रय रेषेखालील स्वत:ची जागा नसलेले २ लाखापेक्षाही अधिक पात्र लाभार्थी आहेत. परंतु स्वत:ची जागा नसल्यामुळे त्यांना घरकूल योजनेचा लाभ घेता येत नाही. अशा लाभार्थ्यांसाठी ५० हजार रुपयांपर्यंत स्वत:ची जागा खरेदी करण्याकरिता आर्थिक सहाय्य देण्यासाठी " पंडीत दीनदयाळ उपाध्याय घरकूल जागा खरेदी अर्थसहाय्य योजना " ही नवीन योजना शासन सुरु करीत आहे. यासाठी नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययांपैकी २०० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**सर्वांसाठी घरे.** २१. इंदिरा आवास योजना, रमाई आवास योजना तसेच शबरी आदिवासी घरकूल योजना या अंतर्गत १ लाख घरे बांधण्याचे शासनाचे लक्ष्य असून नवीन तंत्रज्ञानाचा उपयोग करुन स्वच्छतागृहांसहीत उत्तम प्रतीची घरे बांधण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी सन २०१५-१६ मध्ये ८८४ कोटी ४६ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

झोपडपट्टीवासी व मध्यमवर्गीय यांना परवडणारी घरे उपलब्ध व्हावीत, यादृष्टीने नवीन गृहनिर्माण धोरण शासन आणणार आहे. सन २०२२ पर्यंत कोणीही घराविना राहणार नाही असा शासनाचा प्रयत्न राहील.

महाराष्ट्राचे सध्या होत असलेले वाढते नागरीकरण लक्षात घेता नागरी भागातील लोकांच्या सुविधांचा वेगळयाने विचार करणे क्रमप्राप्त झाले आहे. नागरी भागातील जनतेला उच्च प्रतीच्या नागरी सुविधा उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो मार्ग .

२२. मुंबई मेट्रो लाईन-३ च्या कामास गती देण्यासाठी विशेष हेतू वाहन (Special Purpose Vehicle) कंपनीची स्थापन करण्यात आली असून या प्रकल्पासाठी सन २०१५-१६ मध्ये १०९ कोटी ६० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

नागपूर व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्प.

२३. नागपूर व पुणे मेट्रो रेल्वे प्रकल्पाच्या कामास विशेष गती देण्यासाठी या प्रकल्पांना सन २०१५-१६ मध्ये अनुक्रमे १९७ कोटी ६९ लाख व १७४ कोटी ९९ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

स्मार्ट सिटीज.

२४. वाढत्या नागरीकरणाबरोबरच भौतिक व सामाजिक सुविधांमध्ये वाढ करुन देशात गुंतवणुकीचा ओघ वाढविण्याच्या दृष्टीने विकसित शहरे निर्माण करणे गरजेचे आहे. त्यानुसार देशात स्मार्ट सिटीज विकसित करण्याची संकल्पना राबविण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या सदर योजनेतून राज्यातील जास्तीत जास्त शहरांचा अंतर्भाव करण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये २६८ कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

स्वच्छ भारत अभियान .

२५. देशातील सर्व शहरे आणि नगरे पूर्णपणे स्वच्छ, निरोगी आणि राहण्यायोग्य करुन सर्व नागरिकांना चांगले आरोग्य व स्वच्छ पर्यावरण देण्यासाठी केंद्र सरकारने स्वच्छ भारत अभियानाची देशात सुरुवात केली आहे. या योजनेची राज्यात अंमलबजावणी करण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये ३२० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. तसेच, ग्रामीण भागात हे अभियान राबविण्यासाठी ४९० कोटी ४९ लाख रुपये इतका नियतव्यय राज्य हिश्श्यासाठी उपलब्ध आहे.

महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियान.

२६. महाराष्ट्र सुजल व निर्मल अभियानाअंतर्गत नागरी भागातील २५७ पाणीपुरवठा व मलनि:सारण योजनांना मान्यता देण्यात आल्या आहेत. याकरिता सन २०१५-१६ मध्ये ८० कोटी ५० लाख रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे. यासाठी मी पुढे आवश्यकतेनुसार अधिक निधी उपलब्ध करुन देईन.

महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान.

२७. महाराष्ट्र शासन राज्यातील सर्व 'ड' वर्ग महानगरपालिका व सर्व नगरपरिषदा व नगरपंचायतीमध्ये " महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाभियान " राबविण्यात येत आहे. यासाठी सन २०१५-१६ मध्ये ६०० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

बस स्थानकांचे नूतनीकरण.

२८. रस्त्यांसोबतच परिवहन, रेल्वे, बंदरे व विमानतळ या सुविधा राज्याच्या दीर्घकालीन विकासाचा पायाच आहेत व त्यांच्या विकासावर विशेष भर देणे आवश्यक आहे. राज्याच्या सर्वसामान्य जनतेचे वाहतुकीचे साधन असलेल्या बस गाड्यांची व बस स्थानकांची दुरावस्था लक्षात घेता, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर या ठिकाणच्या बस स्थानकांचे नूतनीकरण करण्याचा पथदर्शी कार्यक्रम हाती घेण्यात येत आहे. तसेच नवीन एसटी बस खरेदी अधिक प्रमाणात करण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी यावर्षी १६ कोटी ४० लाख रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे व या व्यतिरिक्त सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययांपैकी १२५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

पर्यावरण रक्षणाच्या दृष्टीने परिवहन सेवेकरिता जैविक इंधन वापरण्यासाठी महापालिकांना प्रोत्साहन देण्यात येईल. तसेच, विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करण्याकरिता महिला चालक असलेल्या ई-टॅक्सींना प्रोत्साहन देण्यात येईल.

रेल्वे प्रकल्प.

२९. महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांना गती देण्यासाठी राज्य शासन व रेल्वे मंत्रालय यांच्या समभागातून एक विशेष उपयोजिता वाहन (Special Purpose Vehicle) स्थापण्याचा शासनाने तत्त्वतः निर्णय घेतलेला आहे. बांधकामाधीन रेल्वे प्रकल्पांसाठी ६८ कोटी ६० लाख रुपये इतका नियतव्यय ठेवला आहे.

जयगड बंदर विकास.

३०. दळणवळणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असलेले रत्नागिरी जिल्ह्यातील जयगड बंदर रेल्वेशी जोडण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, कोकण रेल्वे व विकासक, जयगड बंदर यांच्यात सांमजस्य करार करण्यात आला आहे.

विमानतळ व धावपट्ट्या यांचा विकास.

३१. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीच्या अखत्यारीतील ओझर, कोल्हापूर, अकोला, शिर्डी, कराड, अमरावती, सोलापूर, चंद्रपूर इत्यादी विमानतळांच्या धावपट्ट्यांचे परीक्षण व देखभाल तसेच विमानतळांच्या विकासाकरिता सन २०१५-१६ मध्ये ९१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

मेक इन महाराष्ट्र.

३२. औद्योगिक क्षेत्रातील महाराष्ट्राचे अग्रणी स्थान कायम रहावे व राज्याची आर्थिक प्रगती व्हावी या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून “मेक इन महाराष्ट” हा नाविन्यपूर्ण उपक्रम शासनाने सुरु केला आहे. राज्यात गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या गुंतवणूकदारांना उद्योग सुरु करण्यास सर्वसाधारणपणे आवश्यक असलेले परवाने मिळविण्याची कार्यपध्दती सहजसाध्य व सुलभ होणार आहे. तसेच, यासाठीच्या विविध प्रक्रियांसाठी लागणारा कालावधी कमी होणार आहे.

मिहान प्रकल्प. ३३. मिहान प्रकल्पाकरिता भूसंपादन व पुनर्वसन यासाठी सन २०१५-१६ मध्ये २०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

सामूहिक प्रोत्साहन योजना. ३४. सन २०१४-१५ मध्ये २५ विशाल प्रकल्पांना मान्यता देण्यात आली असून, त्या प्रकल्पात एकूण रुपये १३ हजार १६६ कोटी एवढी गुंतवणूक व १३ हजार ९८८ व्यक्तींना रोजगाराच्या संधी अपेक्षित आहेत. यासाठी २०१५-१६ मध्ये ३ हजार १५० कोटी रुपये तरतूद प्रस्तावित आहे.

राज्याची औद्योगिक समूह विकास योजना. ३५. राज्यातील औद्योगिकदृष्ट्या अविकसित क्षेत्राच्या विकासास चालना मिळण्यासाठी औद्योगिक समूह विकास योजना सुरु करण्यात आली असून, यासाठी २०१५-१६ मध्ये २६ कोटी ५० लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

वस्त्रोद्योग विकास. ३६. वस्त्रोद्योग धोरणांतर्गत राज्यातील पात्र वस्त्रोद्योग प्रकल्पांना दीर्घ मुदतीच्या कर्जावर ५ ते ७ टक्के व्याज सवलत देण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये ५९ कोटी ६६ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

तसेच विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्रातील पात्र वस्त्रोद्योग प्रकल्पांना दीर्घ मुदती कर्जाच्या १० टक्के भांडवली अनुदान देण्यासाठी २८ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

यंत्रमागधारकांना वीज दरात सवलतीच्या नियमित योजनेसाठी सन २०१५-१६ मध्ये १ हजार २३२ कोटी ५३ लाख रुपयांची तरतूद आहे.

काजू प्रक्रिया उद्योगास प्रोत्साहन अनुदान. ३७. कोकणातील काजू प्रक्रिया उद्योग घटकांनी उत्पादित व प्रक्रिया केलेल्या काजूपैकी अंतिमतः विक्री झालेल्या काजूच्या विक्रीवर मूल्यवर्धित कर भरल्यानंतर त्यांना त्या कराची रक्कम प्रोत्साहन अनुदान म्हणून देण्यात येते . यासाठी २०१५-१६ मध्ये ५ कोटी रुपये इतकी तरतूद प्रस्तावित आहे.

महाराष्ट्र घरेलू कामगार कल्याण मंडळ. ३८. घरेलू कामगारांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र घरेलू कामगार मंडळ गठित करण्यात आले आहे. यासाठी सन २०१५-१६ मध्ये २० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**नाशिक सिंहस्थ कुंभमेळा.** ३९. नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सन २०१५-१६ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा सुरु होणार आहे. गोदावरी नदी काठावर घाट बांधणे, पोच रस्ते, तात्पुरती निवासस्थाने इत्यादी कामे असलेल्या २ हजार ३७८ कोटी ७३ लाख रुपयांच्या आराखड्यास मंजुरी दिली आहे. यातील बहुतांशी कामे पूर्णत्वाच्या टप्प्यावर असून उर्वरित कामे लवकरच पूर्ण होणे अपेक्षित आहे.

**तीर्थक्षेत्र विकास.** ४०. राज्यातील हाजीअली दर्गा, मुंबई, ताजूद्दीनबाबा दर्गा, नागपूर, तसेच श्री भिमाशंकर, जिल्हा पुणे, श्री त्र्यंबकेश्वर, जिल्हा नाशिक, श्री परळी वैजनाथ, जिल्हा बीड, श्री औंढा नागनाथ, जिल्हा हिंगोली, श्री घृष्णेश्वर, जिल्हा औरंगाबाद ही ५ ज्योतीर्लिंगे आणि जेजूरी, जिल्हा पुणे, करवीरवासीनी श्री महालक्ष्मी देवस्थान, कोल्हापूर, श्री क्षेत्र माहूरगड, जिल्हा नांदेड, श्री क्षेत्र अक्कलकोट, जिल्हा सोलापूर, श्री शनीशिंगणापूर, जिल्हा अहमदनगर आणि श्री महालक्ष्मी जगदंबा मंदीर कोराडी, जिल्हा नागपूर, श्री क्षेत्र लोणी, जिल्हा वाशिम, श्री क्षेत्र रिद्धपूर, अमरावती व श्री क्षेत्र निरा नरसिंगपूर, जिल्हा पुणे या तीर्थक्षेत्र विकासासाठी नियमित नियतव्यया व्यतिरिक्त नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी १२५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**कामठी जिल्हा नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक.** ४१. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीला पुढील वर्षी १२५ वर्षे पूर्ण होत असल्याचे औचित्य साधून कामठी, जिल्हा नागपूर येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक व प्रशिक्षण केंद्र विकसित करण्यासाठी नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययांपैकी १० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**किल्ल्यांचे जतन व संवर्धन.** ४२. राज्य संरक्षित किल्ल्यांचे जतन व संवर्धन करण्यासाठी व स्थानिक लोकाभिमुख पर्यटनासाठी बृहत आराखडा तयार करण्यात येत आहे. यावर्षी एकात्मिक विकास आणि संवर्धनासाठी १० महत्त्वाचे किल्ले निवडण्यात येतील. या प्रत्येक किल्ल्यात पर्यटक माहिती केंद्र तसेच मूलभूत सोयीसुविधा असतील. परिसर स्वच्छ राखणे तसेच संयुक्त वनव्यवस्थापन समितीमार्फत वनीकरण व त्याचे संरक्षण यांचाही यामध्ये अंतर्भाव असेल.

काही निवडक किल्ल्यांमध्ये ध्वनिप्रकाश कार्यक्रम (Sound and Light Show) करण्याचे प्रस्तावित आहे. यावर्षी रायगड किल्ल्यावर “ रायगड महोत्सव ” भरविण्यात येणार आहे.

या सर्व कामांसाठी नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी ५० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**निसर्ग पर्यटन विकास मंडळाची स्थापना.** ४३. महाराष्ट्राला विपुल निसर्ग संपदा लाभली आहे. त्यामुळे महाराष्ट्रात पर्यटनास भरपूर वाव आहे. पर्यटनाच्या माध्यमातून रोजगार निर्मिती व स्थानिक जनतेचे राहणीमान सुधारणे तसेच त्याचे राज्याच्या आर्थिक प्रगतीतील महत्व लक्षात घेता, पर्यटन विकासाला चालना देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

वनातील निसर्ग पर्यटन विकसित करणे तसेच जैविक विविधतेचे संरक्षण करुन वनावर उपजीविकेसाठी अवलंबून असणाऱ्या लोकांचे राहणीमान सुधारणे या उद्देशाने महाराष्ट्र राज्य निसर्ग पर्यटन विकास मंडळ स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. यासाठी सन २०१५-१६ मध्ये प्राथमिक बाबींसाठी ५० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**कोकण ग्रामीण पर्यटन विकास कार्यक्रम.** ४४. महाराष्ट्राला कोकणात ७२० किलोमीटर सागरी किनारा लाभलेला आहे. ही बाब विचारात घेऊन सन २०१५-१६ मध्ये सागरी किनारा पर्यटनासाठी ४२ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे.

**चांदा आणि बांदा पर्यटन विकास.** ४५. महाराष्ट्राच्या दोन टोकांवरील चंद्रपूर व सिंधुदुर्ग हे खनिज व नैसर्गिक संपत्तीचे वरदान लाभलेले जिल्हे आहेत. या नैसर्गिक संपत्तीचा इष्टतम वापर व्हावा यासाठी सघन नियोजन व अंमलबजावणीचा विशेष कार्यक्रम राबविण्यात येईल. त्याअनुषंगाने चंद्रपूर जिल्ह्यातील बल्लारपूर येथे बंगळूरुच्या धर्तीवर वनस्पती उद्यान (Botanical Garden) तसेच सिंधुदुर्ग जिल्हयात पर्यटन वृध्दीसाठी विशेष कार्यक्रम आखण्यात येणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी तयार केलेला जिल्हा पर्यटन आराखडा वर्ल्ड बँक/एशियन डेव्हलपमेंट बँक यांना आर्थिक सहाय्य मिळण्यासाठी विचारार्थ सादर करण्याचे प्रस्तावित आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील प्रस्तावित “सी वर्ल्ड” प्रकल्पासाठी आवश्यक निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. केंद्रीय पर्यटन मंत्रालयासही या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देण्याची विनंती करण्यात आली असून, हा प्रकल्प अग्रक्रमित झालेला आहे. सी-वर्ल्ड प्रकल्पाचा भाग म्हणून कौशल्य विकास प्रशिक्षण केंद्र उभारण्याचेही प्रस्तावित आहे.

**मार्गस्थ सुविधा.** ४६. महाराष्ट्रात पर्यटन स्थळी भेटी देणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांना दिशादर्शक फलक, आंतरराष्ट्रीय दर्जाची स्वच्छतागृहे, पिण्यासाठी पाणी व खाद्यगृहे यासारख्या मार्गस्थ सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. मुंबई, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, औरंगाबाद, बुलढाणा, कोल्हापूर इत्यादी ठिकाणी पर्यटन सुविधांसाठी सन २०१५-१६ करिता २ कोटी २५ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. याव्यतिरिक्त नियोजन विभागांतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी ५० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**पर्यावरण संवर्धन.**

४७. राष्ट्रीय सरोवर संवर्धन योजनेअंतर्गत सोलापूर, धूळे, नंदूरबार, नागपूर, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग, चंद्रपूर, ठाणे, रायगड, लातूर, अहमदनगर, सातारा व पुणे या जिल्ह्यातील पर्यावरण संवर्धनाच्या अनुषंगाने तलावांची कामे सुरु असून, त्यासाठी सन २०१५-१६ मध्ये ९ कोटी १० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. तसेच स्थानिक पर्यावरणाचे महत्त्व लक्षात घेऊन त्याविषयी पर्यावरण संरक्षण,संवर्धन, वातावरणीय बदल कृती कार्यक्रम व जनजागृतीविषयक कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. त्यासाठी आवश्यक नियतव्यय प्रस्तावित आहे.

**ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प, गोरेवाडा आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान प्रकल्पांचा विकास.**

४८. संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, ताडोबा - अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि गोरेवाडा प्राणी संग्रहालय येथे मसाईमारा सारखे आंतरराष्ट्रीय दर्जाचे सामूहिक वन्यजीव संरक्षित क्षेत्र व पर्यटन सुविधा विकसित करण्यात येत आहेत. तसेच अभयारण्यात जंगल सफारी करताना पर्यटकांना बायोडायजेस्टर टॉयलेट, पिण्यासाठी शुध्द पाणी यांसारख्या सुविधा उपलब्ध करुन देण्यात येतील. त्याचबरोबर इतर ठिकाणीही वन पर्यटनस्थळे विकसित करण्यात येतील. या सर्व बाबींसाठी सन २०१५-१६ करिता ९१ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. याव्यतिरिक्त मी नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययांपैकी १०० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**उत्तमराव पाटील वन उद्यानांची निर्मिती.**

४९. सामाजिक वनीकरणामार्फत प्रत्येक जिल्हयात " उत्तमराव पाटील वन उद्यानांची " निर्मिती करण्याचा शासनाचा मानस आहे. अशा उद्यानात वनीकरण तसेच सर्व प्रकारच्या स्थानिक प्रजातींच्या वनस्पतींची लागवड करण्यात येईल. तसेच, त्यामध्ये निसर्ग परिचय केंद्र, वन व पर्यावरण शिक्षण केंद्र यांचाही समावेश असेल. यासाठी २० कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे.

**हायटेक रोपवाटिका.**

५०. राज्यात प्रत्येक जिल्हयाच्या ठिकाणी उच्च तंत्रज्ञानावर आधारित रोपवाटिका निर्माण करण्यात येतील. यासाठी सन २०१५-१६ मध्ये १८ कोटी ७० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**महाराष्ट्र राज्य औषधी वनस्पती व अकाष्ठ वनोपज सहकारी संघाची स्थापना.**

५१. पेसा अधिनियम, १९९६ आणि वनहक्क कायदा, २००६ यांमधील तरतुदींची परिणामकारक अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने त्रिस्तरीय सहकारी संघ स्थापन करण्यात येणार आहे. या यंत्रणेद्वारे औषधी वनस्पती, सुगंधी वनस्पती, गोंद, तेंदूपाने इत्यादींचे संकलन, मूल्यवर्धन, साठवण, विपणन इत्यादींचा समन्वय साधणे शक्य होईल व मालाची योग्य किंमत वनातील व वनालगत राहणाऱ्या गावातील गावकऱ्यांना मिळेल.

यासाठी सन २०१५-१६ मध्ये प्राथमिक बाबींसाठी ५० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**महाराष्ट्र राज्य बांबू विकास मंडळाची स्थापना.**

५२. राज्याने नुकतेच डिसेंबर २०१४ मध्ये नवीन बांबू धोरण जाहीर केले आहे. बांबू व बांबूवर आधारित लघुउद्योग क्षेत्राला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने " महाराष्ट्र राज्य बांबू विकास मंडळ " स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. प्रारंभिक बाबींसाठी आवश्यक नियतव्यय प्रस्तावित आहे.

**श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना.**

५३. अधिसूचित वन्यजीव अभयारण्याबाहेर (Buffer Zone) लोकसहभागातून वन वृक्षाच्छादन वाढविणे, वृक्ष संपत्तीचे व्यवस्थापन करणे तसेच राज्याच्या ग्रामविकास विभाग, आदिवासी विकास विभाग व जलसंधारण विभागांच्या योजना एकात्मिक पद्धतीने राबविणे यासाठी " श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना " या नावाने नवीन योजना सुरु करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययांपैकी २५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरणाची स्थापना.**

५४. राज्यात विविध ठिकाणी असलेल्या प्राणी संग्रहालयातील व्यवस्था सुसूत्रित करण्याच्या दृष्टिकोनातून व केंद्र सरकारच्या प्राणी संग्रहालय प्राधिकरण यांच्याशी समन्वय ठेवण्याकरिता राज्य पातळीवर " महाराष्ट्र राज्य प्राणी संग्रहालय प्राधिकरण " स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. यासाठी सन २०१५-१६ मध्ये आवश्यक नियतव्यय उपलब्ध केला आहे.

**सामूहिक निसर्ग संवर्धन.**

५५. मानव आणि वन्य प्राणी संघर्ष कमी करुन अभयारण्य व राष्ट्रीय उद्यानालगतच्या गावकऱ्यांना पर्यटना संबंधित लाभ देण्याच्या दृष्टीने "सामूहिक निसर्ग संवर्धन" ही नवीन संकल्पना राबविण्यात येणार आहे. हा कार्यक्रम उमरेड-कऱ्हांडला या अभयारण्या लगतच्या गोठणगाव येथे उद्योजकता सामाजिक दायित्वाच्या (Corporate Social Responsibility) माध्यमातून प्रायोगिक तत्वावर राबविण्याचे प्रस्तावित आहे. तसेच, ही संकल्पना ताडोबा व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रात उद्योजकता सामाजिक दायित्व व शासकीय अनुदान या माध्यमातून राबविण्यात येईल.

**कौशल्य विकास.**

५६. तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणे हे आपल्या पिढीसमोर तसेच शासनासमोर सर्वात मोठे आव्हान आहे. शासनाने देऊ केलेल्या सवलतीवर अवलंबून राहण्यास आजच्या तरुणास स्वारस्य नाही. साहजिकच, काहीतरी रोजगार असावा व परिवाराचा आणि समाजाचा एक उत्पादक सदस्य म्हणून सन्मानाने जगता यावे, अशी

या तरुणवर्गाची सर्वसाधारण भावना आहे. तरुणांना आपले भावी आयुष्य समर्थपणे घडविता यावे, यासाठी परंपरागत शिक्षणास कौशल्य विकासाची जोड देणे आवश्यक आहे. मा.पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी "स्कील इंडिया" ची संकल्पना मांडली आहे. त्यास अनुसरुन आम्ही "कुशल महाराष्ट्र, रोजगारयुक्त महाराष्ट" हे ध्येय समोर ठेवले आहे. राज्यात नुकताच कौशल्य विकास व उद्योजकता विभाग असा स्वतंत्र विभाग निर्माण केला आहे.

राज्यात सध्या कौशल्य विकास व स्वयंरोजगार सहाय्याच्या काही योजना आहेत. या सर्व योजनांचे मूल्यमापन व आवश्यकतेनुसार एकत्रीकरण करुन कौशल्य विकास व स्वयंरोजगार सहाय्यासाठी " प्रमोद महाजन कौशल्य विकास योजना " या नावाने एक व्यापक योजना अमलात आणण्याचे ठरविले आहे. या योजनेअंतर्गत तरुणांना ते करत असलेल्या किंवा त्यांचा कल असलेल्या रोजगारासाठी प्रशिक्षण तसेच स्वयंरोजगारासाठी दरवर्षी ५ लक्ष युवकांना औद्योगिक प्रशिक्षण संस्था व खाजगी संस्थेत प्रशिक्षण देऊन ७५ टक्के आश्वासित नोकरी मिळेल असे नियोजन करण्यात येईल.

बांधकाम, उत्पादन आणि निर्मिती, वस्त्रोद्योग, ऑटोमोबाईल, आरोग्य सेवा, बँकींग, वित्त आणि विमा, औद्योगिक औषध उत्पादने, कृषि प्रक्रिया आदी क्षेत्रांवर भर देण्यात येणार आहे. या योजनेच्या माध्यमातून जास्तीत जास्त तरुणांपर्यत पोहोचण्याचे आमचे प्रयत्न राहतील. प्रत्येक जिल्ह्यात कौशल्य प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचा तसेच, औद्योगिक प्रशिक्षण केंद्रांचे रुपांतर कौशल्य विकास केंद्रात करण्याचा शासनाचा मानस आहे. योजनेचा सविस्तर तपशील स्वतंत्रपणे जाहीर केला जाईल. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी शासन प्रयत्नांची पराकाष्ठा करील. कौशल्य विकास व उद्योजकता विभागासाठी यावर्षी मी १६१ कोटी ८४ लाख रुपये इतका नियतव्यय उपलब्ध केला आहे.

**संसाधन व प्रशिक्षण केंद्राची स्थापना.**

५७. राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या विचारांचा अंगीकार करत सेवाग्राम, जिल्हा वर्धा या ठिकाणी ग्रामोद्योग, कुटिरोद्योग व हस्तकला यांना प्रोत्साहन देण्यासाठी संसाधन व प्रशिक्षण केंद्र स्थापन करण्याचे शासनाने ठरविले आहे. यासाठी मी, नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी २५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**क्रीडा धोरणाची अंमलबजावणी.**

५८. राज्याच्या नवीन क्रीडा धोरणाची सन २०१२ मध्ये घोषणा करण्यात आली. तथापि, त्याची अंमलबजावणी फारशी झाली नाही. सदर धोरणाची परिणामकारक अंमलबजावणी करण्यात येईल.

**युवकांसाठी व्यायाम शाळा.** ५९. व्यायामाचे महत्त्व लक्षात घेऊन राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात खेळाडू/युवक/ युवती यांच्यासाठी जिल्हा क्रीडा संकुलाच्या ठिकाणी अथवा महानगरपालिका/ नगरपालिकांच्या उद्यानांमध्ये सार्वजनिक व्यायाम शाळा टप्याटप्याने सुरु करण्यात येतील. यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तालुका व जिल्हास्तरीय क्रीडा संकुलाच्या बांधकामासाठी सन २०१५-१६ करिता ५० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**मुलींसाठी वसतिगृहे.** ६०. माध्यमिक शाळेत दाखल होणाऱ्या मुलींचे गळतीचे प्रमाण कमी व्हावे या प्रमुख उद्देशाने मुलींसाठी वसतिगृहे बांधण्याची योजना आहे. यासाठी सन २०१५-१६ मध्ये गतवर्षापेक्षा दुप्पट म्हणजे ११२ कोटी ५२ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**मुलींच्या शासकीय वसतिगृहांना संरक्षक भिंत बांधणे.** ६१. महाराष्ट्रातील सर्व मुलींच्या शासकीय वसतिगृहांना टप्प्याटप्प्यांनी संरक्षक भिंत बांधण्याचे शासनाचे नियोजन असून, सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी २५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे. येत्या ३ वर्षात राज्यातील सर्व वसतिगृहांना संरक्षक भिंती बांधण्याचा शासनाचा निर्धार आहे.

**सर्व शिक्षा अभियान.** ६२. दरवर्षी शालेय शिक्षणावर सुमारे ३० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक खर्च करण्यात येतो. असे असूनही, शिक्षणाचा दर्जा हा चिंतेचा विषय आहे. दर्जेदार व मूल्याधिष्ठीत शिक्षणासाठी सर्व योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी शासन कटिबद्ध आहे. शिक्षणाचा दर्जा वाढण्याकरिता, विद्यार्थ्यांची परीक्षा तसेच शिक्षकांचे मूल्यमापन यावर भर देण्यात येईल. याखेरीज सर्व शिक्षक व विद्यार्थी यांची बायोमेट्रीक पद्धतीने उपस्थितीची नोंद घेतली जाईल. हे करताना शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणाचा उद्देश साध्य करत शिक्षणापासून कोणीही वंचित राहणार नाही याची खबरदारी घेणे ही यापुढील काळात शासनाची प्राथमिकता राहणार आहे.

सर्व शिक्षा अभियान हा ६ ते १४ वर्षे वयोगटातील सर्व मुलामुलींना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध करुन देऊन त्यांच्यातील मानवी क्षमतांचा विकास साधणारा कार्यक्रम आहे. बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम- २००९ ची अंमलबजावणी या योजनेमार्फत करण्यात येते. यासाठी सन २०१५-१६ मध्ये १ हजार ६९० कोटी ५६ लाख रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई व इतर कला महाविद्यालयांचे आधुनिकीकरण.**

६३. कला शिक्षणाचा दर्जा व गुणवत्तेत वाढ व्हावी यादृष्टीने कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील जे. जे. स्कूल ऑफ आर्ट, मुंबई व इतर कला महाविद्यालयांचे आधुनिकीकरण व सक्षमीकरण करण्याचे नियोजित असून त्यासाठी सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागांतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी १० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

तसेच राज्यामध्ये स्कूल ऑफ प्लॅनिंग ॲण्ड आर्किटेक्चर ही आंतरराष्ट्रीय दर्जाची संस्था मराठवाड्यातील औरंगाबाद येथे स्थापन करण्यात येत आहे.

**राष्ट्रीय औषधनिर्माण-शास्त्र शिक्षण व संशोधन संस्था.**

६४. राज्यात औषधनिर्माणशास्त्र या क्षेत्रात पुरेसे व्यावसायिक, प्रगत व कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, प्रगत तंत्रज्ञानाद्वारे या क्षेत्रात संशोधन वृध्दिंगत करुन त्याचा लाभ सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी केंद्र सरकारच्या सहाय्याने नागपूर येथे राष्ट्रीय औषधनिर्माणशास्त्र शिक्षण व संशोधन संस्था (NIPER) सुरु करण्याचा शासनाचा मानस आहे.

**केंद्रीय नागरी सेवा परीक्षार्थींना प्रोत्साहन व जिल्हा मुख्यालयी अभ्यासिका.**

६५. केंद्रीय नागरी सेंवामधील मराठी टक्का वाढविण्यासाठी केंद्रीय लोकसेवा आयोगाची पूर्व परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या महाराष्ट्रातील उमेदवारांना मुख्य परीक्षा व मुलाखतपूर्व प्रशिक्षणाकरिता अर्थसहाय्य देण्यात येईल. त्याचप्रमाणे राज्यातील होतकरु विद्यार्थ्यांना संदर्भ ग्रंथासह अभ्यासाची सोय व्हावी म्हणून प्रत्येक जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी सुसज्ज व अद्ययावत अभ्यासिका स्थापन करण्यात येणार आहेत. तसेच, कोल्हापूर व नागपूर येथील भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्रांचे बळकटीकरण करण्याचा मानस आहे. यासाठी नियोजन विभागांतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी २० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**वैद्यकीय पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे श्रेणीवर्धन.**

६६. पुणे, औरंगाबाद, अकोला, अंबेजोगाई, जिल्हा बीड, सोलापूर, नांदेड, मिरज, जिल्हा सांगली, धुळे, यवतमाळ, लातूर व इंदिरा गांधी वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमधील पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या श्रेणीवर्धनाचा कार्यक्रम हाती घेतला आहे. त्याद्वारे सदर वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये अतिरिक्त सुविधा उपलब्ध करुन पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे श्रेणीवर्धन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. यासाठी सन २०१५-१६ मध्ये २० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**वैद्यकीय महाविद्यालयांच्या इमारतींचे बांधकाम.** ६७. राज्यात नव्याने स्थापन झालेल्या नंदूरबार, मुंबई, अलिबाग, सातारा, गोंदिया, बारामती व चंद्रपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांच्या इमारतींचे बांधकाम व इतर प्रारंभिक सोयी सुविधांसाठी ३५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे. याशिवाय नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी १०० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

तसेच, इंदिरा गांधी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नागपूर व परिसराच्या विकासाकरिता बृहत आराखडा तयार करण्यात आला असून, त्याच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात येईल.

सर जे. जे. समूह रुग्णालय, मुंबई येथे हायराईज्ड सुपर स्पेशालिटी रुग्णालय इमारतीच्या बांधकामास मान्यता देण्यात आली आहे. हा प्रकल्प हायराईज्ड समितीच्या परवानगीअभावी रखडला होता. तथापि, कायद्यात बदल करुन हायराईज्ड इमारतीसाठी परवानगी देण्यात आली आहे. त्यामुळे या प्रकल्पास आता गती मिळेल. या प्रकल्पामुळे १००० अधिकच्या रुग्णखाटा उपलब्ध होतील.

**राष्ट्रीय आरोग्य अभियान.** ६८. राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान यांसह इतर ११ राष्ट्रीय रोग नियंत्रण कार्यक्रमांचा समावेश राष्ट्रीय आरोग्य अभियानात करण्यात आला आहे. याअंतर्गत अर्भक व माता मृत्यूदर कमी करणे, आरोग्य सेवांची उपलब्धता वाढविणे, सर्वसमावेशक व दर्जेदार गुणवत्तापूर्ण प्राथमिक सेवा उपलब्ध करुन देणे, संसर्गिक व असंसर्गिक आजारांचा प्रतिबंध व नियंत्रण करणे इत्यादी बाबींचा समावेश आहे. सन २०१५-१६ मध्ये सदर अभियानासाठी १ हजार ९९६ कोटी ४८ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना.** ६९. राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजनेखाली पात्र लाभार्थींना ९७१ आजारांवरील उपचार सुविधा अनुज्ञेय आहेत. सन २०१५-१६ मध्ये याकरिता ३०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**नवजात शिशू रुग्णवाहिका.** ७०. कमी वजनाच्या व आजारी नवजात अर्भकांच्या मृत्यूचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने त्वरित उपचारासाठी ७० नवजात शिशू रुग्णवाहिका उपलब्ध करण्याचे नियोजित आहे. त्याकरिता पुरेसा निधी देण्यात येईल.

**आरोग्य संस्थांची बांधकामे.** ७१. राज्यात नागरी क्षेत्रातील आरोग्य संस्थांच्या बांधकामासाठी १८१ कोटी ३६ लाख रुपये, ग्रामीण रुग्णालयांच्या बांधकामासाठी ४७ कोटी रुपये, अनुशेषांतर्गत स्थापित ग्रामीण रुग्णालयांच्या बांधकामासाठी ११२ कोटी रुपये तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र आणि उपकेंद्रांच्या बांधकामासाठी ४९ कोटी ५६ लाख रुपये असा एकूण ३८९ कोटी ९२ लाख रुपयांचा भरीव नियतव्यय २०१५-१६ मध्ये प्रस्तावित आहे.

**महिला बचत गटांचे सक्षमीकरण.** ७२. नारी शक्तीचा सन्मान व आदर करत महिलांचे सक्षमीकरण व त्यांना आत्मनिर्भर करण्यासाठी विविध योजना प्रभावीपणे राबविण्याचा शासनाचा मनोदय आहे. ही ध्येयपूर्ती करण्यासाठी महिला वर्गास सूक्ष्म वित्तपुरवठा करण्याची नितांत आवश्यकता आहे.

पोषण आहारासाठी स्थानिक कृषी उत्पादनाच्या माध्यमातून चांगले पोषण मूल्य उपलब्ध करुन देण्याचा शासनाचा मानस आहे. तसेच दर्जेदार व पोषक आहार उपलब्ध करुन देणाऱ्या महिला बचत गटांना यासाठी प्रोत्साहन देत आवश्यक यंत्रसामग्री खरेदीसाठी मदत करण्यात येईल. तसेच महिलांना आत्मनिर्भर करण्यासाठी महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी जिल्हास्तरावर कायमस्वरुपी " पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर बाजारपेठ " निर्माण करण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी नियोजन विभागांतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी २०० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**अंगणवाडी सेविकांचे मानधन.** ७३. अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस यांच्या मानधनात केलेली वाढ दिनांक १ एप्रिल २०१५ पासून लागू करण्यात येईल.

**माझी कन्या भाग्यश्री योजना.** ७४. केंद्र सरकारच्या "बेटी बचाओ बेटी पढाओ" या योजनेच्या धर्तीवर "माझी कन्या भाग्यश्री योजना" या नावाने नवीन योजना राज्यात सुरु करण्यात येत आहे. यासाठी सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी २०० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळाला भागभांडवल.** ७५. मौलाना आझाद अल्पसंख्यांक विकास महामंडळाला भागभांडवली अंशदाना-पोटी गतवर्षीच्या ३५ कोटी रुपयांच्या तुलनेत सन २०१५-१६ साठी ७५ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे. याव्यतिरिक्त नियोजन विभागांतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी ७५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे. या माध्यमातून विशेषत: मुलींच्या रोजगार, स्वयंरोजगार व रोजगारक्षम प्रशिक्षणासाठी कर्ज उपलब्ध करुन देण्यात येईल.

**अल्पसंख्यांकाकरिता ग्रामीण क्षेत्र विकास योजना.** ७६. राज्यातील अल्पसंख्यांक बहुल ग्रामीण क्षेत्रात पायाभूत सुविधा उपलब्ध करुन देऊन तेथे वास्तव्यास असलेल्या अल्पसंख्यांक लोकसमूहातील नागरिकांच्या जीवनमानाचा दर्जा उंचावणे या उद्दिष्टासाठी ग्रामीण क्षेत्र विकास योजना कार्यान्वित आहे. यासाठी सन २०१५-१६ करिता २५ कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

यासोबतच भिवंडी, मालेगाव व मिरज या शहरी भागातही ही योजना सुरु करण्याचा शासनाचा मानस आहे.

**अनुसूचित जाती उपयोजना.** ७७. अनुसूचित जातीच्या लोकसंख्येच्या प्रमाणात अनुसूचित जाती उपयोजनेसाठी ६ हजार ४९० कोटी रुपये इतका नियतव्यय प्रस्तावित आहे. त्यापैकी २ हजार ४०० कोटी रुपये जिल्हा योजनांसाठी तर ४ हजार ९० कोटी रुपये राज्यस्तर योजनांसाठी देण्यात आला आहे. या अंतर्गत प्रामुख्याने आरोग्य सेवेसाठी १७५ कोटी ५२ लाख रुपये, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकासाठीच्या रमाई घरकूल ग्रामीण योजनेसाठी ३२० कोटी रुपये, तसेच शासकीय वसतीगृह सुरु करणे व त्यांचे परिरक्षण याकरिता २२५ कोटी रुपये आणि निवासी शाळा सुरु करण्यासाठी रुपये १०० कोटी इतका नियतव्यय प्रस्तावित आहे.

**विशेष सहाय्य योजना.** ७८. विशेष सहाय्य योजनेअंतर्गत दारिद्रय रेषेखालील कुटुंबातील वृध्द, निराधार, विधवा, परित्यक्ता व अपंग या घटकांना संजय गांधी निराधार अनुदान योजना आणि श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजनेखाली अर्थसहाय्य देण्यात येते. त्यासाठी सन २०१५-१६ या वर्षासाठी १ हजार ४५१ कोटी ५० लाख रुपये तरतूद प्रस्तावित आहे.

**आदिवासी उपयोजना.** ७९. आदिवासी लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासी उपयोजनेसाठी ५ हजार १७० कोटी रुपये एवढा नियतव्यय प्रस्तावित आहे. याअंतर्गत इंदिरा आवास व घरकूल योजनेसाठी ४६ कोटी रुपये, रस्ते विकाससाठी ५१९ कोटी १४ लाख रुपये, विद्युतीकरणासाठी १३० कोटी ३२ लाख रुपये, सार्वजनिक आरोग्यासाठी २९३ कोटी १९ लाख रुपये, सुवर्णमहोत्सवी आदिवासी पूर्व माध्यमिक शिष्यवृत्तीसाठी २४२ कोटी रुपये व भारत सरकार शिष्यवृत्ती योजनेसाठी राज्य योजनेअंतर्गत ७० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**आदिवासी उपयोजनेतून ग्रामपंचायतींना थेट निधी.** ८०. आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतींना त्यांच्या एकूण स्थानिक विकासासाठी आदिवासी विकास विभागास प्राप्त होणाऱ्या एकूण निधीच्या ५ टक्के निधी सन २०१५-१६ पासून अबांधिल स्वरुपात (Untied) देण्यात येणार आहे. हा निधी ग्रामपंचायतींना लोकसंख्येच्या प्रमाणात थेट देण्यात येईल. असे करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले

राज्य आहे. या निधीतून गावातील मूलभूत सुविधा जसे की रस्ते, घनकचरा विल्हेवाट आणि वन संरक्षणासंदर्भातील कामे करण्यात येतील. ही कामे संयुक्त वन व्यवस्थापन/ग्रामवन/इको विकास समिती व ग्रामसभा यांचेमार्फत व त्यांच्या मंजुरीने करता येतील.

**अमरावती, औरंगाबाद, नाशिक व नागपूर येथे सीसीटीव्ही.**

८१. मला सांगताना आनंद होत आहे की, मुंबई शहरासाठी सीसीटीव्ही बसविण्याच्या प्रक्रियेस आता गती मिळाली आहे. याखेरीज अमरावती, औरंगाबाद, नाशिक व नागपूर या शहरांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचा शासनाचा मनोदय आहे.

**सायबर गुन्हे.**

८२. राज्यात सायबर गुन्ह्यांच्या संख्येत दिवसागणिक वाढ होत असून, या गुन्हेगारांवर वचक बसविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यामध्ये सायबर क्राईम लॅब स्थापन करण्याचा शासनाचा मानस आहे. त्यासाठी सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययांपैकी १८ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**स्मार्ट पोलीस स्टेशन व वसाहत.**

८३. राज्यातील पोलीस ठाणी व वसाहतींमध्ये वेगवेगळ्या आधुनिक सुविधा पुरविण्याचा शासनाचा मानस आहे. त्याअनुषंगाने नागपूर जिल्ह्यातील लकडगंज हे पहिले स्मार्ट पोलीस ठाणे व वसाहत म्हणून विकसित करण्यात येत आहे. यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करण्यात येईल.

**न्यायालयांकरिता पायाभूत सुविधा.**

८४. राज्यातील विविध ठिकाणी न्यायालयांसाठी न्यायालयीन इमारती व न्यायाधीशांसाठी निवासस्थाने बांधण्याची योजना राबविण्यात येते. यासाठी सन २०१५-१६ मध्ये ४१३ कोटी ६० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**डिजिटल महाराष्ट्र.**

८५. २१ वे शतक हे तंत्रज्ञानाचे युग मानले जाते. तंत्रज्ञानाचा वापर केवळ सरकार व सरकारी कार्यालयांच्या सोयीसाठीच न करता जनतेच्या सोयीसाठी व रक्षणासाठीदेखील केला जावा तसेच या तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शासकीय माहिती सर्वसामान्य जनतेला सहजपणे उपलब्ध व्हावी यासाठी डिजिटल महाराष्ट्र ही संकल्पना राबविण्याचा शासन संकल्प करीत आहे. यासाठी माहिती व तंत्रज्ञान विभागास १० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित असून आवश्यक तो अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

**लाभार्थ्यांना थेट वित्तीय सहाय्य.**

८६. केंद्र सरकारकडून राबविण्यात येणाऱ्या आधार प्रकल्पाच्या अंमलबजावणीमध्ये महाराष्ट्र राज्य देशात अग्रेसर आहे. शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध कल्याणकारी योजना या जनधन योजनेच्या अंतर्गत लाभार्थ्यांचे बँक खाते क्रमांक, आधार क्रमांक आणि मोबाईल क्रमांक (JAM) यांच्याशी संलग्न करुन नागरिकांना त्यांच्या बँक खात्यामध्ये वित्तीय सहाय्य थेट जमा करण्यात येणार आहे. यामुळे शासकीय योजनांमधील गैरव्यवहारास आळा बसून अधिक पारदर्शकता येईल.

तसेच, सर्व शिष्यवृत्त्या व शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती बायोमॅट्रीक पद्धतीचा अवलंब करुन विद्यार्थ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येईल.

**सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये बायोमेट्रिकचा अवलंब.**

८७. सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील गैरव्यवहारांना आळा घालण्यासाठी बायोमेट्रिक पद्धतीचा अवलंब करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. यासाठी यावर्षी २३ कोटी रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे.

**जिल्हा नाट्यगृहांची निर्मिती.**

८८. राज्याचा समृध्द सांस्कृतिक वारसा पुढे चालविण्याच्या दृष्टीने नवोदित कलाकारांना पुरेसा वाव मिळावा यासाठी जिल्हास्तरावर सुसज्ज नाट्यगृहे बांधण्याचा शासनाचा मानस असून, त्यासाठी नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी २० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला असून पुढील ५ वर्षात सुसज्ज नाट्यगृहाविना एकही जिल्हा राहणार नाही असे ठरविले आहे.

**लोककला व लोकवाद्य यांचे संगणकीय दस्तऐवजी-करण.**

८९. महाराष्ट्रातील ज्या लोककला व जी लोकवाद्ये आजच्या आधुनिक युगात नामशेष व लुप्त होत चालली आहेत, अशा लोककला व अशी लोकवाद्ये यांचे संगणकीय दस्तऐवजीकरण करुन त्यांचे जतन करण्यात येणार आहे. यासाठी सन २०१५-१६ करिता ७० लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची स्मारके.**

९०. महाराष्ट्र राज्याच्याच नव्हे तर संपूर्ण देशाच्या इतिहासाची, वर्तमानाची व भविष्याची जडणघडण, छत्रपती शिवाजी महाराज व भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर या दोन थोर युगपुरुषांशी निगडित आहे.

अरबी समुद्रात छत्रपती शिवाजी महाराजांचे आंतरराष्ट्रीय दर्जाचे भव्य स्मारक उभारण्यात येईल. याकरिता सन २०१५-१६ मध्ये १०० कोटी रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

मुंबईतील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या इंदू मिलच्या जागेवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक उभारण्यात येऊन त्यासाठी आवश्यक तो निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याचबरोबर नागपूर येथील दीक्षाभूमीच्या विकासासाठीही निधी उपलब्ध करुन देण्यात येईल.

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे व स्वर्गीय गोपीनाथ मुंडे यांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रात अमूल्य योगदान आहे. त्यांच्या स्मृती जतन करण्यासाठी अनुक्रमे मुंबई व औरंगाबाद येथे त्यांची स्मारके उभारण्यात येतील.

**हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती व क्रांतीवीरांच्या स्मृतींचे जतन.**

९१. भारत भूमीला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या शूर वीरांनी हसतहसत आपल्या प्राणांचे बलिदान दिले अशा शूर वीरांची, हुतात्म्यांची स्मारके आमच्या पिढीसाठी स्फूर्ती स्थळे आहेत. जाज्वल्य देशभक्तीचे स्फुल्लींग चेतवणाऱ्या या हुतात्मा स्मारकांची दुरावस्था ही समाजासाठी चिंतेची बाब आहे. आपल्या संस्कृतीचा मानबिंदू असलेल्या या हुतात्मा स्मारकांची दुरुस्ती व नूतनीकरण करण्याकरिता नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी २५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला असून, आवश्यक तो अतिरिक्त निधी उपलब्ध करुन देण्याचा माझा मानस आहे.

**थोर व्यक्तींची स्मारके.**

९२. हुतात्मा राजगुरु, क्रांतीवीर लहूजी साळवे, वीर बाबूराव पुलेश्वर शेडमाके या क्रांतीवीरांच्या स्मृतींचे जतन व्हावे यासाठी त्यांच्या स्मारकांचे बांधकाम करण्याचा तसेच श्री संत सेवालाल महाराज समाधी स्थळ, पोहरादेवी, जिल्हा वाशिम व संत मुंगसाजी महाराज समाधीस्थळ, धामणगाव देव, जिल्हा यवतमाळ, जगतज्योती महात्मा बसवेश्वर, मंगळवेढा, जिल्हा सोलापूर या समाधीस्थळांचा तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची तपोभूमी गोंदोडा, तालुका चिमूर, जिल्हा चंद्रपूर या स्थळांचा विकास करण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी ११ कोटी ७० लाख रुपयांचा नियतव्यय प्रस्तावित आहे. याशिवाय नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी २० कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**परमवीर चक्र प्राप्त वीरांचे स्मारक.**

९३. देशासाठी आपल्या प्राणांची बाजी लावून लढणाऱ्या व प्रसंगी प्राणांची आहुती देणाऱ्या भारतीय सैन्यदलातील वीरांना परमवीर चक्र देऊन गौरविण्यात येते. अशा वीरांचे भव्य स्मारक मुंबईमध्ये उभारण्याचा शासनाचा मानस आहे. यासाठी सन २०१५-१६

मध्ये नियोजन विभागाअंतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी ५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

तसेच या शूरवीरांची ओळख महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांना व्हावी व त्यांच्या पराक्रमापासून स्फूर्ती घेऊन समर्थ नागरिक निर्माण व्हावेत यादृष्टीने शालेय विद्यार्थ्यांसाठी एक निबंध स्पर्धा आयोजित करण्यात येऊन या स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक पारितोषिक देऊन गौरविण्यात येईल.

**मराठी भाषेचा प्रचार व प्रसार आणि दुर्मिळ ग्रंथांचे संगणकीकरण.**

९४. ९५६ दुर्मिळ ग्रंथांचे डिजिटायझेशन तसेच तंजावर विद्यापीठात उपलब्ध असलेले मोडी लिपीतील ऐतिहासिक दस्तऐवज देवनागरी लिपीत रुपांतरित करणे इत्यादी उपक्रम शासनाने हाती घेतले आहेत. तसेच राज्य ग्रंथालय, मुंबई येथील दुर्मिळ ग्रंथ, महत्त्वाचे वृत्तपत्र इत्यादी लिखाणांचे संगणकीकरण करण्यात येईल. यासाठी सन २०१५-१६ मध्ये १४ कोटी ७१ लाख रुपये नियतव्यय प्रस्तावित आहे.

**एशियाटिक ग्रंथालयाचे डिजिटायझेशन.**

९५. मुंबईतील प्रसिध्द एशियाटिक ग्रंथालयाचे डिजिटायझेशन करण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये नियोजन विभागांतर्गत अवितरीत नियतव्ययापैकी ५ कोटी रुपये नियतव्यय चिन्हांकित केला आहे.

**अस्तित्वात असलेल्या कायद्यांचे मूल्यमापन.**

९६. राज्यात सध्या अस्तित्वात असलेले कायदे, योजना, शासन निर्णय इत्यादींचे मूल्यमापन करुन लोकहिताच्या दृष्टिकोनातून त्यांचे वर्गीकरण करणे, अनावश्यक बाबी रद्द करणे यासाठी एक पथदर्शक कार्यक्रम म्हणून मूल्यमापन समिती स्थापन करण्यात येईल.

शेतीसाठी प्रस्तावित केलेल्या विविध योजना, उद्योग व व्यापारासाठी पोषक वातावरण, उत्तम पायाभूत सुविधा, शासकीय निधीचा परिणामकारक विनियोग व एकंदरित चोख आर्थिक व्यवस्थापन यामुळे राज्य यापुढे दोन अंकी विकास दर गाठेल, याची मला पूर्ण खात्री आहे. हे करीत असताना शेतीला स्थैर्य प्राप्त होऊन, शेतीचा विकास दर ६ टक्क्यांच्या वर जाईल असाही मला विश्वास आहे. सभागृहासमोर मागील वर्षाच्या आर्थिक घडामोडींचा परामर्श घेणारा आर्थिक पाहणी अहवाल कालच सादर केला आहे.

म्हणून इथे अधिक तपशीलात न जाता मी थोडक्यात त्यासंदर्भातील माहिती सभागृहासमोर मांडत आहे.

**स्थूल आर्थिक आढावा व राज्याचे उत्पन्न.**

९७. पुर्वानुमानानुसार २००४-०५ च्या स्थिर किमतीवर आधारित राज्याचे स्थूल राज्य उत्पन्न २०१४-१५ मध्ये मागील वर्षाच्या तुलनेत ५.७ टक्क्यांनी वाढणे अपेक्षित असून मागील वर्षात ते ७.३ टक्क्यांनी वाढले. यावर्षी केंद्रीय सांख्यिकी कार्यालय, भारत सरकार यांनी पायाभूत वर्ष २०११-१२ असे निश्चित केले आहे. नवीन मालिकेनुसार या वाढीच्या दरात बदल अपेक्षित आहे.

प्रचलित किमतीनुसार २०१३-१४ मध्ये महाराष्ट्राचे अंदाजित दरडोई राज्य उत्पन्न १ लाख १७ हजार ९१ रुपये इतके आहे, तर अंदाजित दरडोई राष्ट्रीय उत्पन्न ८० हजार ३८८ रुपये इतके आहे.

अखिल भारतीय घाऊक किमतींच्या निर्देशांकावर आधारित चलनवाढीचा दर एप्रिल २०१४ ते फेब्रुवारी २०१५ या कालावधीकरिता २.४६ टक्के असून तो गतवर्षीच्या तत्सम कालावधीत ५.९८ टक्के होता.

पायाभूत वर्ष २००४-०५ वर आधारित अखिल भारतीय औद्योगिक उत्पादनाचा सरासरी निर्देशांक एप्रिल २०१४ ते जानेवारी २०१५ या कालावधीकरिता १७४.० होता. मागील वर्षाच्या तत्सम कालावधीच्या तुलनेत तो २.५ टक्के एवढा वाढला.

**वार्षिक योजना सन २०१५-१६.**

९८. वार्षिक योजना सन २०१५-१६ चे आकारमान रुपये ५४ हजार ९९९ कोटी रुपये इतके प्रस्तावित करण्यात आलेले आहे. या आकारमानाच्या ११.८ टक्के प्रमाणे रक्कम रुपये ६ हजार ४९० कोटी अनुसूचित जाती उपयोजनेसाठी आणि आदिवासी उपयोजनेसाठी ९.४ टक्के प्रमाणे रुपये ५ हजार १७० कोटी नियतव्यय उपलब्ध करुन देण्यात आला आहे. जिल्हा सर्वसाधारण योजनेसाठी रुपये ७ हजार १२७ कोटी ९३ लाख देण्यात आले असून, मागील वर्षाच्या तुलनेत रुपये १ हजार २२५ कोटी ९३ लाखाची वाढ करण्यात आली आहे.

नुकत्याच १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी प्राप्त झाल्या व त्या अनुषंगाने केंद्र शासनाने वाटपयोग्य करसंकोषात राज्याचा वाटा ३२ टक्के वरुन ४२ टक्के केला आहे. तसेच अभिहस्तांकित करावयाचा निधीमध्ये या करसंकोषात महाराष्ट्राचा वाटा ५.१९९ टक्के वरुन वाढवून ५.५२१ टक्के इतका केला आहे. ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यासाठी प्राप्त होणा-या अनुदानात भरीव वाढ केली आहे. तसेच आपत्ती निवारण निधी यात देखील राज्यास नियमित प्राप्त होणाऱ्या अनुदानात वाढ होईल. या सोबतच केंद्र शासनाने केंद्राकडून प्राप्त होणाऱ्या योजनांतर्गत अनुदानाचे सूत्र बदलले आहे किंवा त्यात बदल अपेक्षित आहे. याचा पूर्ण तपशील अद्याप प्राप्त व्हायचा आहे. त्यामुळे केंद्राच्या सूचनेप्रमाणे अनेक योजनांच्या केंद्र व राज्य हिश्श्यात फरक होईल व त्यानुषंगाने पुनर्विनियोजनद्वारे किंवा पूरक मागण्याद्वारे बदल करणे आवश्यक ठरेल.

**राज्याची वित्तीय स्थिती**

९९. जून, २०१४ मध्ये अतिरिक्त अर्थसंकल्प सादर केला असताना १ लाख ८० हजार ३२० कोटी रुपये महसूली जमा अपेक्षित केली होती. वर्षभरातील महसूल संकलनाचा कल पाहता सुधारित अंदाज १ लाख ८० हजार ७९४ कोटी रुपये एवढा निश्चित केला आहे. वर्षाच्या सुरुवातीस महसुली खर्च १ लाख ८४ हजार ४२३ कोटी रुपये इतका अपेक्षित होता. सुधारित अंदाजात हा खर्च १ लाख ९४ हजार ६७७ कोटी रुपये इतका निश्चित केला आहे. परिणामी वर्षाच्या सुरुवातीस अपेक्षित ४ हजार १०३ कोटी रुपये महसुली तूट वाढून ती १३ हजार ८८३ कोटी रुपये इतकी झालेली आहे. प्रामुख्याने तूटीत ही वाढ औद्योगिक वीज दरात दिलेल्या सवलती, दुष्काळामुळे शेतकऱ्यांना दिलेल्या मदतीमुळे झाली आहे.

सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पामध्ये महसूली जमा १ लाख ९८ हजार २३० कोटी रुपये व महसूली खर्च २ लाख १ हजार ९८८ कोटी रुपये अंदाजित केला आहे. परिणामी ३ हजार ७५७ कोटी रुपये महसुली तूट येत आहे. अनावश्यक खर्चात बचत करुन व महसूल वसूली अधिक प्रभावीपणे करुन ही तूट मर्यादित करण्याचा प्रयत्न मी करेन.

सन २०१५-१६ चा अर्थसंकल्प सादर करण्याच्या शेवटच्या टप्प्यात मी या सार्वभौम व पवित्र सभागृहाच्या माध्यमातून राज्यातील जनतेला पुनश्च आश्वस्त करु इच्छतो की, ज्या ज्या घटकांसाठी आम्ही नियतव्यय प्रस्तावित केला आहे, त्यात कोणतीही कपात न करण्याचा सर्वथैव प्रयत्न करु. या राज्याच्या विकासाचा संकल्प करताना जे उद्दिष्ट आम्ही निश्चित केले आहे, त्या उद्दिष्टपूर्तीसाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करु, अशी ग्वाही मी या पवित्र सभागृहाच्या साक्षीने राज्यातील जनतेला देत आहे.

आता मी अर्थसंकल्पाच्या भाग २ कडे वळतो.